यशवंत पंचायत राज अभियान सन २०१८-१९
राज्यातील अत्युत्कृष्ट जिल्हा परिषदा, पंचायत
समित्यांना पुरस्कार योजनेसाठी निधी वितरण

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः झेडपीए-२०१९/प्र.क्र.२८/पंरा-१.

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१.
तारीखः- २६मार्च,२०१९.

वाचा :-

१) वित्त विभाग परिपत्रक क्रमांकः क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२ एप्रिल, २०१८
२) वित्त विभाग परिपत्रक क्रमांकः क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.२५जानेवारी, २०१९
३) शासन निर्णय ,ग्रामविकास विभाग क्र. झेडपीए-२०१८/प्र.क्र.१५२/पंरा-१, दि.१९मार्च,२०१९.

प्रस्तावना :-

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान उल्लेखनीय आहे. राज्यामधील विकासाच्या सर्व योजना पंचायत राज संस्थामार्फत राबविल्या जातात. त्यामुळे पंचायत राज संस्थांनी केलेल्या कामगिरीनुसार त्यांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यातील पंचायत राज संस्थांचे व्यवस्थापन व विकास कार्यात अत्युत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींसाठी सन २००५-०६ या आर्थिक वर्षापासून राज्य / विभाग स्तरावर यशवंत पंचायत राज अभियान ही अभिनव पुरस्कार योजना सुरु करण्यात आली आहे.

या विभागामार्फत राज्यातील ग्रामपंचायतींसाठी “स्मार्ट ग्राम व्हिलेज” ही योजना नव्याने राबविण्यात येत असल्याने “यशवंत पंचायत राज अभियान” या योजनेमध्ये ग्रामपंचायती समाविष्ट न करण्याचा निर्णय सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासून शासनाने घेतला आहे. त्यानुषंगाने यशवंत पंचायत राज अभियान या योजनेअंतर्गत जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या चालू वित्तीय वर्षात जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकांची एकूण रक्कम रु. २६९.०० लक्ष व पुरस्कार वितरण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रु. २६.४० लक्ष अशी एकूण रु. २९५.४० लक्ष ची तरतूद सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. पंरतू वित्त विभागाने संदर्भाधीन क्र. (३) येथील परिपत्रकान्वये कार्यक्रमाच्या खर्चाच्या बाबींवर योजनाअंतर्गत अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ८०% निधी खर्चासाठी वितरीत केलेला आहे. त्यानुसार या प्रयोजनासाठी आता सुधारीत अंदाजात रू.२९५.४० लक्ष ऐवजी रू. २५६.३२ लक्ष एवढा निधी खर्चासाठी उपलब्ध आहे.सदर रू.२५६.३२ लक्ष एवढा निधी विभागीय आयुक्त, कोकण विभाग ,कोकण यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

यास्तव पंचायत राज संस्थांना पारितोषिकासाठी व कार्यक्रमाच्या आयोजनासाठी खालीलप्रमाणे रकमा मंजूर करण्यात येत आहे.

अ. क्र	पंचायत राज संस्था	राज्यस्तर पुरस्कार रक्कम			विभागस्तर पुरस्कार रक्कम (पुरस्काराची रक्कम X विभागातील एकूण पुरस्कार = एकूण रक्कम)			एकूण पुरस्कार रक्कम
		प्रथम	द्वितीय	तृतीय	प्रथम	द्वितीय	तृतीय	(३ते८ची बेरीज)
१	२	३	४	५	६	७	८	९
१	जिल्हा परिषद	२५ लक्ष	१७ लक्ष	१५ लक्ष	०	०	०	५७ लक्ष
२	पंचायत समिती	१७ लक्ष	१५ लक्ष	१३ लक्ष	९x६=५४ लक्ष	७x६=४२ लक्ष	५.५०x६= ३३ लक्ष	१७४लक्ष
एकूण								**२३१लक्ष**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकांची एकूण रक्कम रू. २३१.०० लक्ष व पुरस्कार वितरणाच्या कार्यक्रमांसाठी रू.२५.३२ लक्ष असे एकूण रू. २५६.३२ लक्ष एवढे अनुदान मंजूर करण्यात येत आहे.

सदरचा खर्च मागणी क्रमांक एल-३, मुख्य लेखाशिर्ष २५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, १०१- पंचायती राज, ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०४) विशेष कार्यक्रम व ग्राम अभियान कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यामध्ये उत्कृष्ट काम केल्याबद्दल जिल्हा परिषदांना व पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांना प्रोत्साहनपर अनुदान (संकेतांक २५१५ ००६२) (दत्तमत) (योजनेत्तर) लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ च्या मंजूर तरतूदीमधून करण्यात यावा.

संदर्भाधिन क्र. (३) येथील शासन निर्णय दिनांक १९मार्च,२०१९ अन्वये अर्थसंकल्पित करण्यात आलेली रु. २५६.३२ लक्ष इतकी रक्कम खर्च करण्यास विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने सदर निधी त्यांच्या अधिनस्त ठेवण्यात येत आहे. सदर निधी खर्च झाल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करण्याची जबाबदारी तसेच सदर निधीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त कोकण, कोकण विभाग, कोकण यांची राहील.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाने त्यांचे अनौपचारीक संदर्भ क्र.९९/२०१९, दि.२७ फेब्रुवारी,२०१९ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२६१५०१३१२३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Shantaram Yadav

Digitally signed by Sharad Shantaram Yadav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7b2ace04cd5b33035f08de84acacbc24916dc2bb31884c10f28f127b001c2fea, cn=Sharad Shantaram Yadav
Date: 2019.03.26 15:36:30 +05'30'

(शरद यादव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०००३२
२. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०००३२
३. मा.प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय,मुंबई-४००००१
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण.
५. अप्पर कोषागार अधिकारी, उप कोषागार कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.
६. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई,
७. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर.
८. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण विभाग, नवी मुंबई.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१०. उप सचिव (सर्व) ग्रामविकास विभाग,बांधकाम भवन, मर्झबान पथ,फोर्ट,मंत्रालय,मुंबई.
११.अवर सचिव, (वित्त विभाग) (कार्यासन अर्थ-३, अर्थ-१७, व्यय-१५ व अर्थोपाय शाखा), मंत्रालय, मुंबई.
१२.अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.ग्राम विकास विभाग (कार्यासन क्र.वित्त-१, वित्त-७, आस्था-५, बांधकाम भवन, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
१३. निवडनस्ती (कार्यासन पंरा-१)